# महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ

दूरध्वनी क्र. २४०१०४३७/२४०२०७८१
Visit us at : http://mpcb.gov.in
Email : eic@mpcb.gov.in

"आपली सेवा आमचे कर्तव्य"

कल्पतरु पॉईंट, ४ मजला,
शीव माटुंगा स्किम रोड क्र. ८
शीव सर्कलसमोर, शीव (पूर्व)
मुंबई - ४०० ०२२

जा.क्र. मप्रनि/ 251125-FTS-0253 दिनांक:25/११/२०२५

## परिपत्रक

विषय: मंडळातील सर्व कार्यालयांमध्ये ई-ऑफीस प्रणालीच्या अंमलबजावणीबाबत.

संदर्भ: १. शासन परिपत्रक क्र.: मतासं-२०१२/प्र.क्र.२५३/का.३९, दिनांक ०९ नोव्हेंबर २०२०.

२. मंडळ परिपत्रक जा. क्र. म प्र नि/ २५०९२३-FTS-००३२ दिनांक २३/०९/२०२५.

शासनाच्या धोरणानुसार शासकीय कामकाजात संगणकाचा अधिकाधिक व प्रभावी वापर करून शासकीय कामकाज गतिमान व्हावे, कामकाजात सुसूत्रता यावी, दस्तऐवज व माहिती सुरक्षित रहावी, निर्णय प्रक्रिया गतिमान व सुलभ होऊन कार्यालयीन कामकाज सुरळीत व्हावे तसेच महाराष्ट्र शासनाच्या १५० दिवसांच्या कार्यक्रमाअंतर्गत शासकीय व निमशासकीय कार्यालये यांनी ई-ऑफिस च्या कार्यपद्धतीचा अवलंब करण्यास भर देण्यात आला आहे.

तरी वरील बाब लक्षात घेता म प्र नि मंडळाने संदर्भ क्र २ नुसार पहिल्या टप्प्यात मंडळाबाहेरील शासकीय कार्यालयांमध्ये पत्रव्यवहार करण्याकरिता ई-ऑफिस ची अंमलबजावणी हि दिनांक २४/०९/२०२५ पासून सुरु केली आहे, तसेच दुसऱ्या टप्प्यात ई-ऑफिस ची अंमलबजावणी म प्र नि मंडळातील सर्व क्षेत्रीय कार्यालये तसेच मुल्यालययातील सर्व अधिकारी कर्मचारी यांना ई-ऑफिस प्रणाली वापरासाठी आयडी मंडळाच्या ई.आय.सी. विभागामार्फत महाराष्ट्र शासनाच्या माहीती तंत्रज्ञान विभागाशी समंगत साधून तयार करण्यात आलेले आहेत.

सध्या मंडळामधील अंतर्गत टपाल आणि नस्त्यांसाठी IMIS प्रणालीमध्ये असलेल्या FTS व Office Note Module याचा वापर होत आहे, परंतु मंडळामध्ये ई-ऑफिसची अंमलबजावणी केल्यानंतर वरील दोन्ही मॉड्यूल एक महिन्यापर्यंत सुरू ठेवण्यात येतील व त्यानंतर बंद करून त्याजागी १००% ई-ऑफिस चा वापर सर्व अधिकारी कर्मचारी यांनी करावयाचा आहे.

ई-ऑफिसची अंमलबजावणी तत्काळ करवायची असल्याने याचा वापर करण्याकरिताच्या कार्यपद्धती जाणून घेण्याकरिता मंडळाच्या ई.आय.सी. विभागामार्फत प्रशिक्षण घेण्यात येणार आहे सदर प्रशिक्षनासंदर्भात ई आय सी विभागातून वेळोवेळी सर्व कर्मचारी अधिकारी यांना सूचित करण्यात येईल. तरी या संदर्भात प्रत्येक विभाग प्रमुखांनी आपल्या अधिनस्थ अधिकारी व कर्मचारी यांना सदर परिपत्रकाची माहिती अवगत करून द्यावयाची आहे.

सदर ई-ऑफिस प्रणाली वापराबाबत सहाय्यतेसाठी ई.आय.सी विभागाअंतर्गत असलेल्या आयटी हेल्पडेस्क (संपर्क क्र ७०४५११३३४४/७०४५११३३२२) तसेच मंडळातील श्री विनायक कदम, कनिष्ठ लिपिक ई आय सी विभाग (संपर्क क्र. ८६५५३३०९०२) व श्री अर्जुन असगावकर, कनिष्ठ लिपिक, सहाय्यक सचिव (आस्थापना) विभाग (संपर्क क्र.९०४९४३४७६२) यांना संपर्क साधावा.

सदर परिपत्रक दिनांक ०१/१२/२०२५ पासून अंमलात येत असून या परिपत्रकाचे काटेकोरपणे पालन करावे.

(एम देवेंदर सिंह, भा.प्र.से.)
सदस्य सचिव

प्रती:

1. हवा प्रदूषण निवारण अभियंता/जल प्रदूषण निवारण अभियंता/ सहायक सचिव (तांत्रिक) /प्रधान वैज्ञानिक अधिकारी/ मुख्य लेखा अधिकारी- १/२/ कार्यकारी अभियांता/ विधी अधिकारी-१/२/ सहायक सचिव (आस्थापना)/ प्रशासकीय अधिकारी/प्रादेशिक अधिकारी (मुख्यालय)/ प्रादेशिक अधिकारी-जैव-वैद्यकीय कचरा/ सांख्यिकी अधिकारी/जनसंपर्क अधिकारी/
2. वरिष्ठ वैज्ञानिक अधिकारी, मध्यवर्ती प्रयोगशाळा, महापे.
3. प्रादेशिक अधिकारी - मुंबई/ठाणे/ कल्याण/ रायगड/ नवीमुंबई/ पुणे/ नशिक/ नागपूर/ छत्रपती संभाजीनगर/ कोल्हापूर/ अमरावती/ चंद्रपूर
4. प्रादेशिक प्रयोगशाळा ठाणे/पुणे/नाशिक/छत्रपती संभाजीनगर/ नागपूर / चंद्रपूर/चिपळूण.
5. मा अध्यक्ष म प्र नि मंडळ यांचे स्वीय सहायक.
6. मा सदस्य सचिव म प्र नि मंडळ यांचे स्वीय सहायक.